महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना-२०२० दिनांक : 2 /०५/२०२०.

**वाचले:-**

**१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
**२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
**३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४**
**४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६**
**५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**
**६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०**
**७. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/करोना रुग्ण/ माहिती/२०२०, दिनांक १२/४/२०२०**
**८. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक १२/४/२०२०**
**९. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक १३/४/२०२०**

---

**आदेश,**

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ८ व ९ कडील आदेशान्वये रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील कोटनाका येथे १ कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, खालील क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

**आनंदी निवास-आनंदी हॉटेल-राघोबा देव मंदिर-मच्छिमार्केट – उमेश गायकवाड, घर-सतिश फोटो स्टूडीओ-शिवप्रेरणा इमारत- राखे बिल्डींग-काळाधोंडा-भोईर बंगला, केळकर बिल्डींग.**

सदर क्षेत्रातील आनंदी हॉटेल ते जरीमरी मंदीर, उरणकडे येताना बालई क्षेत्र रस्ता हा सुध्दा प्रतिबंधक क्षेत्रात समाविष्ट असल्याने, सदरचा रस्ता तहसिलदार उरण यांनी अत्यावश्यक सेवेसाठी चालू करणेचे आदेश होणेस विनंती केली आहे.

**सबब मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे वरील Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध म्हणून जाहीर केलेल्या क्षेत्रामधील आनंदी हॉटेल ते जरीमरी मंदीर, उरणकडे येताना बालई क्षेत्र रस्ता हा Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) मध्ये समाविष्ट आहे. तथापि सदर रस्ता हा उरण मधील मुख्य रहदारीचा रस्ता आहे. तसेच Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) मधील कोरोना बाधित रुग्ण बरा होऊन ३ दिवस झाले आहेत, व त्या क्षेत्रामध्ये आता एकही कोरोना बाधित रुग्ण नाही. सबब सदर मुख्य रस्ता रहदारीसाठी खुला केल्यानंतरही Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) असलेल्या परिसरावर काही परिणाम होणार नसल्याने सदर मुख्य रस्ता सदर Containment Zone मधून वगळण्याचा आदेश देत आहे.**

तरी सदर रस्त्याचा वापर करताना प्रतिबंधक उपाययोजनानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन तो फक्त अत्यावश्यक सेवेसाठी चालू राहील याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१ , १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी, रायगड
Collector of Raigad

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्षक, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

Scanned with CamScanner